मानव बंधूंनो ,

पूर्वीपासून आजपर्यंत चालत आलेल्या ईश्वरवाद आणि भौतिकवादाच्या दृष्टिकोणातून अजूनपर्यंत मानवाचे अध्ययन संपन्न झाले नाही. विकल्प हे अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतन आहे ही सूचना देताना मला प्रसन्नतेचा अनुभव होतो. मध्यस्ध दर्शन सहअस्तित्ववादामध्ये , सहअस्तित्ववादापासून , सहअस्तित्ववादासाठी मानवाचे अध्ययन शक्य झाले आहे .

मानवाचे अध्ययन मानव चेतनेनुसार मूल्य शिक्षा विधीने (मानवीय संस्कृतीची नियमपूर्ण आचार संहिता ) सर्वांना सुलभ होण्याचे सगळे निरीक्षण, परीक्षण, सर्वेक्षण झालेले आहे ह्याची आपल्याला माहिती करून देण्याचा या विकल्पामध्ये प्रयत्न केला आहे  अशा केद्रांपैकी एक अभ्युदय संस्थान छत्तीसगडच्या सीमेमध्ये कार्यरत आहे.

या सूचनेमध्ये हे सुध्दा प्रस्तुत करत आहे की सगळे समजदार मानव न्यायपूर्वक जगू शकतात , प्रत्येक समजदार परिवार समाधान समृध्दीपूर्वक जगू शकतो. शिक्षा विधीने हे सर्वांना सुलभ होण्याची व्यवस्था आहे . सादर केलेल्या सूचनांशी आपण आपल्या  सव्दिवेकाने परिचित व्हालच हा विश्वास आहे.

– आपला –
ए . नागराज, प्रणेता
मध्यस्थ दर्शन सहअस्तित्ववाद
दिव्य पथ संस्थान
भजनाश्रम ,अमरकंटक
जिल्हा – अनूपपुर (म. प्र.)

# विकल्प ( जीवन विद्या )

1. अस्थिरता ,अनिश्चयता मूलक भौतिक रासायनिक वस्तू केंद्रित विचार म्हणजेच विज्ञान विधीने मानवाचे अध्ययन होऊ शकले नाही. रहस्य मूलक आदर्शवादी चिंतन विधीने सुध्दा मानवाचे अध्ययन होऊ शकले नाही दोन्ही प्रकारच्या वादांमध्ये मानवाला " जीव" म्हटले आहे.

विकल्प रूपामध्ये प्राप्त झालेल्या अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतन मध्यस्थ दर्शन , सहअस्तित्ववादामध्ये मानवाची ज्ञानावस्थेमध्ये असल्याची ओळख केली आणि करवली (गेली आहे).

मध्यस्थ दर्शनानुसार मानव हाच ज्ञाता, (जाणणारा), सहअस्तित्वरूपी अस्तित्व जाणण्यायोग्य वस्तू म्हणजेच जाणण्यासाठी वस्तू आहे, हेच दर्शन ज्ञान आहे. यासह जीवन ज्ञान , मानवीयतापूर्ण आचरण ज्ञानासहित प्रमाणित होण्याची विधी अध्ययनगम्य ( अध्ययनाने अस्तित्वामध्ये समाहित असलेली वस्तू समजणे) झाली आहे.

अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतन ज्ञान, मध्यस्थ दर्शन, सह–अस्तित्ववाद , शास्त्र रूपामध्ये मानवासमोर अध्ययनासाठी माझ्याकडून प्रस्तुत गेले आहे.

2. अस्तित्व मूलक मानव केंद्रित चिंतनाच्या आधी (ए. नागराज, अग्रहार नागराज , जिल्हा हासन, कर्नाटक प्रदेश, भारत) दीक्षा अध्यात्मवादी ज्ञान वैदिक विचारस्वभाविक उपासना कर्माने झाली.

3. वेदांतानुसार "ब्रह्म सत्य , जगत मिथ्या" हे ज्ञान , पण ब्रह्मापापासून जीव जगताची उत्पत्ती सांगितली आहे.

उपासना :– देवी देवतांच्या संदर्भात ( सांगितली आहे ) .

कर्म :– स्वर्ग मिळणारे सगळे कर्म ( भाषा रूपात )

मनुधर्म शास्त्रामध्ये :– चार वर्ण आश्रमांचे नित्य कर्म प्रस्तावित आहे . कर्मकांडामध्ये :– गर्भ संस्कारापासून मृत्यू संस्कारापर्यंत सोळा प्रकारचे कर्मकांड मान्य आहेत आणि त्यांचे कार्यक्रम आहेत.

या सगळयांच्या अध्ययनातून माझ्या मनात प्रश्न आला की –

4. सत्यम् ज्ञानम् अनन्तम् ब्रह्म। यापासून उत्पन्न जीव जगत मिथ्या कसे आहे ? तत्कालीन वेदज्ञ आणि विव्दानांबरोबर जाणून घेण्याच्या क्रमामध्ये मला :–

समाधीमध्ये अज्ञात वस्तू होण्याचे आश्वासन मिळाले. शास्त्रांच्या समर्थनाच्या आधारावर साधना, समाधी, संयम कार्ये संपन्न करण्याची स्वीकृती झाली. साधना, समाधी, रायमाच्या स्थितीमध्ये मी सहअस्तित्व असण्याच्या, राहण्याच्या रूपामध्ये

अध्ययन (केले), अनुभवपूर्ण, समज प्राप्त केली त्याच्या परिणामस्वरूप मध्यस्थ दर्शन सहअस्तित्व वादाच्या रूपामध्ये विकल्प झाला.

5. आदर्शवादी शास्त्रांच्या अनुसार – रहस्यमूलक ईश्वर केंद्रित चिंतन ज्ञान तसेच परंपरेनुसार–ज्ञान अव्यक्त अनिर्वचनीय (अवर्णनीय, सांगता न येण्यासारखे) (आहे).

विकल्पानुसार – ज्ञान व्यक्त, वचनीय, (आहे) अध्ययन विधीने बोध गम्य (बोध होण्यासारखे), व्यवहार विधीने प्रमाण सर्वांना सुलभ होण्याच्या रूपामध्ये स्पष्ट झाले.

6. अस्थिरता, अनिश्चयतामूलक भौतिकवादानुसार वस्तू केंद्रित विचारामध्ये विज्ञानाला ज्ञान मानले गेले ज्यामध्ये मानवाचें नियम बनवले असे म्हटले गेले. ह्याच्या विकल्पामध्ये सहअस्तित्वरूपी अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतन ज्ञानानुसार अस्तित्व स्थिर ( आहे) , विकास आणि जागृती निश्चित (आहे), संपूर्ण नियम प्राकृतिक (नैसर्गिक) असणे, राहणे प्रतिपादित (केले) आहे.

7. अस्तित्व फक्त भौतिक. रासायनिक नसून भौतिक. रासायनिक आणि जीवन वस्तू व्यापक वस्तूमध्ये अविभाज्य वर्तमान आहेत हेच मध्यस्थ दर्शन सहअस्तित्ववाद शास्त्र सूत्र आहे.

## सत्यापन

8. मी जिथून शरीर यात्रा सुरू केली तिथे माझ्या पूर्वजांना वेदमूर्ती म्हटले जायचे. घरात, गावात वेद व वेद विचारांशी संबंधित वेदांत, उपनिषद आणि दर्शनच भाषा ध्वनी–धून रूपात ऐकायला येत होते. परिवार परंपरेमध्ये वेदानुसार उपासना – आराधना – अर्चना – स्तवन कार्य संपन्न होत होते .

9. आमच्या परिवार परंपरेमध्ये अत्युच्च कोटीचे विव्दान, सेवाभावी (होते) तसेच श्रमशील व्यवहाराभ्यास आणि कर्माभ्यास हे स्वाभाविकपणे होते, त्यातली श्रमशीलता आणि सेवा प्रवृत्ती मला स्वीकार्य झाल्या. विव्देत्तेमध्य प्रश्नचिन्ह होते .

10. पहिला प्रश्न समोर आला की –

ब्रह्म सत्यापासून जगत आणि जीवाची उत्पत्ति मिथ्या (खोटी) कशी ?

दुसरा प्रश्न

ब्रह्म हेच बंधन आणि मोक्षाचे कारण कसे ?

तिसरा प्रश्न

शब्द प्रमाण का शब्दाचा धारक वाहक प्रमाण ? आप्त वाक्य प्रमाण ?
शास्त्र प्रमाण का प्रणेता प्रमाण ?
समीचीन (निकट) परिस्थितीमध्ये
अजून एक प्रश्न समोर आला –

चौथा प्रश्न –

भारतामध्ये स्वातृत्र्यानंतर संविधान सभेचे (घटना समितीचे) संघटन झाले जिच्यामध्ये राष्ट्र ,राष्ट्रीयता, राष्ट्रीय चारित्र्य (चरित्र) यांची व्याख्या न होता जनप्रतिनिधी पात्र होण्याची स्वीकृती संविधानामध्ये होणे. (झाली)

व्होट (मत) – (धन) यांच्या संगनमताने जनादेश व जनप्रतिनिधी कसे

संविधानामध्ये एका वाक्यात धर्म निरपेक्षता आणि त्याच्याच बरोबर अनेक जाती, संप्रदाय, समुदायांचा उल्लेख असणे.

संविधानामध्ये समानता – एक वाक्य ,. त्याच बरोबर आरक्षण ( राखीव जागा ) याचा उल्लेख आणि प्रक्रिया असणे.

जनतंत्र (लोकशाही) – (सरकारमध्ये) जनप्रतिनिधींच्या प्रक्रियेमध्ये व्होट – नोट (मत – धन ) यांचे संगनमत असणे.

हे कसले जनतंत्र ( लोकशाही ) आहे ?
समानता व धर्मनिरपेक्षता ?

11. या प्रश्नांच्या जंजाळातून मुक्ती मिळवण्यासाठी तत्कालीन विव्दान, वेदमूर्ती, सन्माननीय ऋषी महर्षींच्या सूचनेने –
1. अज्ञाताला ज्ञात करण्यासाठी समाधी हा एकमेव मार्ग आहे असे (मला) सांगितले गेले ज्याला मी स्वीकारले
2. साधनेला (साधनेसाठी) अनुकूल स्थान रूपामध्ये अमरकंटकला स्वीकारले 3. सन 1950 पासून साधना कर्म आरंभिले . सन 1960 च्या दशकात साधनेमध्ये प्रौढता आली.
4. सन 1970 मध्ये समाधी होण्याची स्थिती स्वीकारण्यापर्यंत आलो. समाधी स्थितीमध्ये माझ्या आशा, विचार, इच्छा मूक झाल्या. अशा स्थितीमध्ये अज्ञात वस्तू ज्ञात होण्याची घटना शून्य होती (काहीच नव्हती) हे पण समजले. या स्थितीनुसार प्रत्येक दिवशी बारा ते अठरा तासापर्यंत साधना होत होती.

समाधी, ध्यान, धारना, क्रमामध्ये संयम या स्वयंस्फूर्त प्रणालीचा मी स्वीकार केला. दोन वर्षांनंतर संयम झाल्यावर समाधी झाल्याचे प्रमाण स्वीकारले. समाधीपासून संयम संपन्न होण्याच्या क्रियेमध्ये सुध्दा बारा ते अठरा तास लागत होते.

परिणामस्वरूप संपूर्ण अस्तित्वाचा सह अस्तित्व रूपामध्ये मला अनुभव झाला, ज्याचे वाडमय मध्यस्थ दर्शन सहअस्तित्ववाद शास्त्र रूपामध्ये प्रस्तुत झाले.

12. सहअस्तित्व व्यापक वस्तूमध्ये संपूर्ण जड चैतन्य संपृक आणि वर्तमान आहे (हे) समजले. सहअस्तित्वामध्येच (अणू) (परमाणू) मध्ये विकासाक्रमाच्या रूपात भुकलेले (भूखे राहणे) अजीर्ण (प्रकारचे अणू) व अणूमध्येच विकासपूर्वक तृप्त घडणूर्ण (अणूंच्या) (परमाणूंच्या) रूपात असणे, समजले .

सहअस्तित्वामध्येच घडणपूर्ण अणू (गठनपूर्ण परमाणु) चैतन्य एकक – जीवन रूपात असणे (हे) समजले

सहअस्तित्वामध्येच भुकलेले (भूखे) व अजीर्ण अणू (परमाणु), रेणू (अणू) व प्राणकोशिकांनीच संपूर्ण रचना तसेच अणू (परमाणु) रेणूनी (अणू) बनलेली धरती आणि अनेक धरती आणि अनेक धरतींची रचना स्पष्ट आहे (हे) समजले.

13. अस्तित्वामध्ये भौतिक रचना रूपी धरतीवरच (संयुग) यौगिक विधीने रसायन तंत्र प्रक्रियेसहित प्राणकोशिकांनी रचित रचना संपूर्ण वन – वनस्पतींच्या रूपामध्ये समृध्द झाल्यानंतर प्राणकेशिकां नीच जीव शरीरांची रचना रचित होणे आणि मनुष्य शरीराची रचनासुध्दा संपन्न होणे व परंपरेमध्ये असणे (हे) समजले .

14. सहअस्तित्वा मध्येच शरीर व जीवनाच्या संयुक्त रूपामध्ये मानव परंपरा आहे, (हे) सजले.

सहअस्तिवामध्ये, सहअस्तित्वापासून, सहअस्तित्वसाठी सहअस्तित्व नित्य प्रभावी आहे (हे) समजले.

हाच नियति क्रम आहे (हे) समजले.

15. नियति विधी सहअस्तित्व स्वभाविक विधीनेच (सहअस्तित्वामध्ये समाहित विधीनेच)

1. अस्तित्वामध्येच चार अवस्था

| | |
|---|---|
| 0. पदार्थ अवस्था | 0. प्राण अवस्था |
| 0. जीव अवस्था | 0. ज्ञान अवस्था |

2. अस्तित्वामध्येच चार पदे.

| | |
|---|---|
| 0. प्राणपद | 0. भ्रांतिपद |
| 0. देवपद | 0.दिव्यपद |

3. आणि

| | |
|---|---|
| 0. विकास क्रम, विकास | 0. जागृति क्रम, जागृती आहे. |

जागृती स्वाभाविक मानव परंपरा हीच मानवत्व  सहित व्यवस्था, समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी (हे) नित्य वैभव आहे (हे) समजले. याला मी सर्वशुभ सूत्र पानले आणि सर्व मानवांमध्ये आहे (हे) स्वीकारले त्याचा परिणाम म्हणून चेतना विकास मूल्य शिक्षा, संविधान, आचरण व्यवस्था स्वाभाविक सूत्र व्याख्या, मानवासमोर प्रस्तुत केले आहे.

भूमी स्वर्ग होओ, मनुष्य देवता होओ
धर्म सफल होओ, नित्य शुभ होओ ।।

– ए. नागराज

## कार्य व्यवहार रूपामध्ये विकल्पाचे स्वरूप

16. विकास क्रमामध्ये पदार्थ अवस्था आणि प्राण अवस्था आहे.

पदार्थावस्था : धरतीमध्ये संपूर्ण प्रकारच्या खनिजांनी संपन्न झाल्यानंतर,

प्राणावस्था सगळया प्रकारची वने, लहान मोठी जंगले, अनेक प्रकारच्या वनस्पतींनी संपन्न असल्याचे आढळते. वन खनिजांच्या संतुलनामध्ये (मोसम) ऋतू संतुलित राहतो, हे सुध्दा समजले.

त्याचबरोबर हे सुध्दा समजले की जागृति क्रमामध्ये मानव, जीव चेतनेने जगत असताना, समुदाय परंपरेमध्ये मानवच पशु मानव, राक्षस छल, कपट, दंभ, पाखंड, द्रोह, विद्रोह, शोषण, युध्द, साम, दाम, दंड भेदरूपी कुचक्राच्या अधीन जाऊन सगळया प्रकारचे अपराध करणे वैध मानून (तो) जगत राहिला, ज्यामुळे धरती आजारी झाली. खनिज कोळसा, खनिज तेल आणि विकिरणीय धातूंचे धरती मधून अपहरण करणे ( हा ) धरतीबरोबरचा अपराध आहे हे स्पष्ट आहे . या क्रमाने धरती आजारी झाली आणि मानवाला राहण्यायोग्य (ती) राहील की नाही हे प्रश्नचिन्ह आहे. याच्या विकल्पामध्ये प्रवाह बलाने ऊर्जा प्राप्त करण्याची सूचना (केली) आहे. सौर ऊर्जेसंबंधी उपकरणांना स्वस्त बनवण्याची, हवेच्या तरंगांचा अधिकाधिक उपयोग करण्यास सुचविले आहे. राष्ट्रीय योजनान्तर्गत विचार करण्यासाठी हा मुद्या सुचविला गेला आहे.

17. धरतीवरील सगळया संविधानांमध्ये चुकीला थांबवणे, अपराधाला अपराधाने थांबवणे, युद्धाला युद्धाने थांबविणे या स्वरूपामध्ये जीव चेतनेचेप प्रमाण पहायला मिळाले आहे. याला वैध मानले आहे.

शिक्षेमध्ये लाभोन्माद, भोगोन्मादी कार्य व्यवहाराला प्रोत्साहन देणे. सगळया प्रकारची प्रचार माध्यमे भय आणि प्रलोभनाच्या अर्थाने कार्यरत

आहेत हीच मानव जातीची योग्यता आहे असं मला समजलं.

18. या कारणांमुळे त्यामध्ये विकल्प प्रस्तुत करण्याची स्वीकृती झाली ती अशी :

सहअस्तित्ववादी विधीने आवर्तनशील अर्थशास्त्र, व्यवहारवादी समाजशास्त्र मानव संचेतनावादी मनोविज्ञान (मानसशास्त्र) शास्त्र प्रस्तुत आहे.

ज्यामध्ये जीवनमूल्य – सुख – शांती – संतोष – आनंद, मानव (लक्ष्यरूपी) समाधान, समृध्दी – अभय – सहअस्तित्व स्वाभाविक परंपरेमध्ये दहा स्तरीय व्यवस्था विधीने सफल होण्याच्या शक्यतेचे प्रमाण वर्तमान असणे प्रस्तावित आहे.

19. मानवीय मूल्य – धीरता, उदारता, दया, कृपा, करूणा आणि मानव (लक्ष्य) समाधान,समृध्दी अभय (चारी अवस्थांबरोबर वर्तमानामध्ये विश्वास) वर्तमान असणे प्रस्तावित आहे.

मानव संस्कृती, सभ्यता विधी, व्यवस्था स्वभाविक प्रमाण वर्तमान असणे प्रस्तावित आहे, हेच सहअस्तित्व आहे.

स्थापित मूल्य – परस्पर संबंधांची ओळख, संबंधांमध्ये मूल्यांचा निर्वाह (पालन) होणे हीच संस्कृती, नित्य उत्सव स्वाभाविक वैभव , अखंड समाज सूत्र व्याख्येनुसार स्वभाविक प्रमाण असणे प्रस्तावित आहे.

शिष्ट मूल्यांबरोबर वस्तूंची देवघेव, समर्पण क्रियांच्या रूपात नित्य उत्सव असणे हेच मानव चेतना स्वभाविक वैभव आहे. हे सुध्दा प्रस्तावित आहे

मानव चेतना हेच व्यवहारामध्ये मानवत्व आहे. आचरणामध्ये नियम आहे

20. मानवत्व (मानवत्वाचे स्वरूप) (हे) समाधान, समृध्दर, अभय, सहअस्तित्व रूपामध्ये प्रमाण वर्तमाण उत्सव आहे.

मानव चेतना स्वभाविक ज्ञान, विवेक, विज्ञानानुसार विचार योजना, कार्ययोजना, व्यवहार, फल परिणाम, विज्ञान, विवेक ज्ञानानुसार होणे हाच नित्य समाधान उत्सव ( आहे ) हेच मानव चेतना
सीाविक वैभव आहे, मानव चेतना स्वभाविक वैभव हेच मानवत्व आहे.

ज्ञान – सहअस्तित्वरूपी

अस्तित्व दर्शन ज्ञान
जीवन ज्ञान
मानवीयतापूर्ण आचरण ज्ञान

विवेक :

जीवन स्वभाविक अमरत्व
शरीर स्वभाविक नश्वरत्व
व्यवहार स्वभाविक नियम

मानवीयतापूर्ण आचरण – स्वधन, स्वनारी, स्वपुरूष, दयापूर्ण कार्य व्यवहार
संबंध, मूल्य, मूल्यांकन, उभय तृप्ती
तन, मन, धन रूपी अर्थाचा सदुपयोग, सुरक्षा

विज्ञान–

काल, क्रिया, निर्णयवादी ज्ञान
क्रियेचा अवधी = काल
क्रिया नित्य वर्तमान

सहअस्तित्वामध्ये संपूर्ण प्रकृती (निसर्ग) क्रिया स्वरूपात वर्तमान (आहे)

क्रिया – श्रम गती परिणाम
परिणामाचे अमरत्व – घडणपूर्ण अणू (गठनपूर्ण परमाणु) चैतन्य एकक, जीवन
श्रमाचा विश्राम – मानव चेतना संपन्न परंपरा, अखंडा समाज सूत्र व्याख्या आणि सार्वभौम व्यवस्था स्वभाविक सूत्र व्याख्या = अभुदय

ऐषणा प्रवृत्ती = पुत्रेषणा, वित्तेषणा, लोकेषणा.

गतीचे गंतव्य – देव चेतना, स्वभाविक वैभव रूपामध्ये, उपकार प्रवृत्ती सर्वशुभ रूपामध्ये हे सगळे अध्ययनमम्य (समजदारीसंपन्न)(अध्ययनाने अस्तित्व स्वभावानुसार वस्तू समजणे) (आहे) आणि मानवामध्ये, मानवामध्ये, मानवापासून, मानवासाठी जगणे (आहे).

## प्रयोजन शक्यता

21. पृथ्वीवरील सातशे कोटी मानवांना अपराध कार्य प्रवृत्तींमधून मुक्ती मिळवण्यासाठी प्रत्येक महिला पुरूषाने समजदार होणे. समजदारीतून समाधान – स्वभाविक प्रमाण वर्तमान हाणे . समाधानाने संपन्न प्रत्येक परिवारामध्ये श्रम नियोजनाने समृध्दी प्रमाणित होणे , समाधान समृध्दी संपन्न प्रत्येक परिवारामध्ये उपकार कार्य प्रवृत्ती प्रमाणित होणे समीचीन (निकट) आहे.

22. चेतना विकास मूल्य शिक्षा संस्कारासहित तांत्रिक शिक्षण विधीनेच, प्रत्येक परिवाराने अखंड समाज सूत्र व्याख्या आणि सार्वभौम व्यवस्था सूत्र व्याख्या रूपामध्ये जगणे हेच समाधान समृध्दी अभय सहअस्तित्व स्वभाविक

परंपरा वैभवित होणे (म्हणजेच) अपराध मुक्त परंपरा होणे समीचीन (निकट) आहे.

प्रत्येक महिला पुरूषामध्ये स्वतःमध्ये नियम, संतुलन, न्याय, धर्म, सत्य स्वभाविक प्रमाण रूपामध्ये वर्तमान वैभव असणे आवश्यक आहे.

23. चेतना विकास मूल्य शिक्षा रूपामध्ये अध्ययनासाठी अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतन म्हणजेच मध्यस्थ दर्शन चार भागांमध्ये (आहे) –

1. मानव व्यवहार दर्शन
2. मानव कर्म दर्शन
3. मानव अभ्यास दर्शन
4. मानव अनुभव दर्शन

24. दर्शनावर आधारित विचार – वाद तीन भागांमध्ये (आहे)
1. समाधानात्मक भौतिकवाद
2. व्यवहारात्मक जनवाद
3. अनुभवात्मक अध्यात्मवाद

25. दर्शन – वादाच्या आधारावर शास्त्र तीन भागांमध्ये (आहे) –
1. आवर्तनशील अर्थशास्त्र
2. व्यवहारवादी समाजशास्त्र
3. मानव संचेतनवादी मनोविज्ञान शास्त्र

26. चिंतन – दर्शन – वाद – शास्त्राच्या आधारावर
जीवन विद्या प्रबोधन प्रणाली स्पष्ट आहे.
मानवीय आचार संहिता रूपी 'संविधान व्यवस्थेची'
अध्ययनासाठी तरतूद आहे, प्रस्तुत आहे,

27. याच्याबरोबरच परिभाषा संहिता प्रस्तुत करण्याची योजना आहे.

## वक्तव्य

''विकल्प'' नावाने **२७** मुद्यांच्या रूपात जी सूचना प्रस्तुत केली आहे त्याच्या मूळ अभिप्रायामध्ये आपला – परका या भिंतीपासून मुक्त, व्देष मुक्त, अपराध मुक्त विधीने मानव चेमनापूर्व समाधान समृध्दी सहित अखंड समाज सार्वभौम व्यवस्था सूत्र व्याख्या रूपामध्ये जगणे हे मानव परंपरेसाठी आवश्यक झाले आहे, जर मानवाला या धरतीवर परंपरेच्या रूपात रहायचे असेल. म्हणून, सकारात्मक भागात निर्णय घेण्याच्या स्थितीत या सूचनांच्या आधारे

सकारत्मक उद्देशाने कितीही प्रश्न होऊ शकतात. त्या सगळयांची उत्तरे माझ्याजवळ सुरक्षित आहेत, ज्यांना हवी आहेत, ते याचे परीक्षण करू शकतात.

ए. नागराज
प्रणेता
मध्यस्थ दर्शन, सहअस्तित्ववाद
दिव्य पथ संस्थान भजनाश्रम, अमरकंटक
जिल्हा – अनूपपुर (म.प्र.)

## विकल्पामध्ये प्रयुक्त शब्दांची परिभाषा

### अ – (अ) (आ)

1. अणू : (परमाणू) स्वभाविक

2. अस्तित्व : असणे, निरंतर, स्वभाविक रूपात राहणे.

3. अविभाज्य : व्यापक वस्तूमध्ये एक – एक वस्तूंची निरंतर क्रियाशीलता, निरंतर वर्तमान राहणे.

4. आश्रम : मानव चेतनेनुसार प्रयत्नपूर्वक प्रमाण प्रस्तुत करणे.

5. अनंत : गणिती पध्दतीने जी गणना समजली नाही – असण्याची शक्यता आहे. कल्पनेमध्य असेल समजलेले नसेल – ज्ञान होण्याची शक्यता असेल.

6. अध्ययन : अनुभव स्वाभाविक प्रकाशात स्मरणपूर्वक केलेल्या क्रिया आणि समजण्याचा प्रयास.

7. अखंड समाज : मानव जात, धर्म, राज्य व्यवस्थेमध्ये करूपता, संस्कृती, सभ्यता, विधी, व्यवस्थेमध्ये एकरूपतेची स्वभाविक वर्तमान परंपरा.

8. अध्ययनगम्य : अध्ययनपूर्वक अस्तित्व स्वभाविक वस्तू समजणे.

9. अजीर्ण अणू (परमाणू) : अणू (परमाणू) तृप्त होण्यामध्ये जितक्या अंशांची निश्चित आवश्यकता असते त्यापेक्षा अधिक अंशाची घडण असणे, विकिरणीयता प्रभावाला प्रसारित करत राहणे आणि आपल्यातील काही अंशांना विसर्जित करण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

10. अपराध : पर–धन, पर–नारी, पर–पुरूष, पर–पीडा देणारा कार्य व्यवहार आणि सुविधा संग्रहाला उपजीविका मानलेला पशू मानव, राक्षस मानव.

11. आवर्तनशीलता : जागृत मानव परंपरेमध्येच प्रत्येक उत्पादनासाठी स्त्रोत कायम ठेवून उत्पादन करून समृध्द हाणे.

12. अभय : वर्तनामध्ये विश्वास संपन्न मानव हेच – अखंड समाज सार्वभौम व्यवस्था सूत्र व्याख्या स्वभाविक प्रमाण.

13. अपर्ण : काही देऊन घेण्याच्या विधीने अर्पण घेण्याच्या अपक्षेसहित श्रम, सेवा,नियोजन क्रिया.

14. अमरत्व : परिणामाचे अमरत्व (घडणपूर्णता) = जीवन

15. अभ्युदय : सर्वतोमुखी समाधान प्रमाण वर्तमान.

16. आशा : मानव परंपरेमध्येच सुखाने जगण्याची आशा सामावलेली आहे.

17. इच्छा : दर्शन आणि त्याच्या प्रकटनाच्या संयुक्त चिंतन क्रियेचे चित्रण.

18. इमानदारी : समजदारीला समाधानकारी समजदारीला प्रमाणित करण्यासाठी निश्चित योजना तयार करणे.

19. उभय तृप्ती : कमीत कमी दोन किंवा दोनापेक्षा अधिक संबंधांमध्ये मूल्यांचा निर्वाह (पालन), मूल्यांकन, उभयतृप्ती,

20. उपकार : समजदार समृध्दी संपन्न होणे, समजदारी, समृध्दीपूर्वक जगू देणे आाणि जगणे.

21. उपासना : उपायपूर्वक वांछित वस्तूंच्या अध्ययन स्वीकृतीच प्राप्ती प्रमाण.

22. भुकलेला अणू : तृप्त अणूमध्ये जितक्या संख्येने अंश असतात, त्यापेक्षा कमी (अंश) राहणे.

23. ऐषणा(ईषणा) : ऐषणांचे (पुत्रेषणा, वित्तेषणा, लोकेषणा) प्रकटन.

24. कर्म : उत्पादन कर्म (आहार, आवास,अलंकार) = सामन्यांकांक्षा (दूरदर्शन, दूरश्रवण, दूरगमन) = महत्त्वाकांक्षेशी संबंधित यंत्र, वस्तू उपकरणांची निर्मिती.

25. कार्ययोजना : योजनेला कार्यान्वित करणे

कार्यव्यवहार : मानवाबरोबर व्यवहार, जड प्रकृतीबरोबर उत्पादन नियंत्रणासाठी कार्य.

26. कर्माभ्यास : (नैसर्गिक) ऐश्वर्यावर उपयोगिता मूल्य कलामूल्यांना स्थापित करण्याच्या क्रियांमध्य पारंगत होणे.

27. कामोन्माद : यौन विचारांमध्ये लिप्त विवश मानव.

## ख

28. खानिज : घन पृथ्वीमधून वांछित वस्तूला खोदून काढली जाणारी वस्तू.

## ग

29. गती : स्थानांतरण परिवर्तन त्व सहित व्यवस्था, समग व्यवस्थेमध्ये भागीदारी.

30. चेतना विकास : जीव चेतनेपेक्षा मानव चेतना श्रेष्ठ, मानव चेतनेपेक्षा देव चेतना श्रेष्ठतर, देव चेतनेपेक्षा दिव्य चेता श्रेष्ठतम.

31. चैतन्य : घडणपूर्ण अणू (गठनपूर्ण परमाणु), चैतन्य एकक जीवन.

32. चिंतन : इच्छाशक्तीमध्ये, इच्छाशक्तीपासून, इच्छाशक्तीसाठी परिमार्जन अनुभव प्रमाण मूलक विचार विधि स्वभाविक प्रकटनल क्रिया

33. जीवन ज्ञान : घडणपूर्णता, क्रियापूर्णता, आचारणपूर्णतेला समजणे, समजावणे.

34. जीवन वस्तू : जगण्याची आशा, विचार, इच्छा, ऋतंभरा, अनुभव प्रमाण होणे.

35. जड : पदार्थ आणि प्राणावस्था स्वाभाविक क्रिया, ज जितक्या लांबी, रूंदी, उंची मध्ये असत तितक्याच विस्तारामध्ये क्रियाशील राहते.

36. जगत : भौतिक रासायनिक संसार.

37. जीवावस्था : जगण्याच्या आशेसहित अनेक वंशांच्या रूपात वर्तमान.

38. जागृती स्वभाविक : मानव परंपरा समजदारी स्वाभाविक सर्वमोमुखी समधानाच्या रूपात प्रमाणित करण्याची परंपरा. शिक्षा – संस्कार, न्याय सुरक्षा उत्पादन कार्य, विनिमय कार्य, स्वास्थ संयम विधीने प्रमाण.

39.जीवन मूल्य : सुख शांती, संतोष, आनंद.

40. जबाबदारी (जिम्मेदारी) : व्यवहार कार्य व्यवहार योजनेमध्ये अनुभव स्वाभाविक वैभवाला परिणित करणे.

## त

41. तृप्त अणू : (परमाणु) (घडणपूर्ण अणु) परिणामाच्या अमरत्वासहित क्रियापूर्णता–आचरणपूर्णतेसाठी तप्तर असणारा घडणपूर्ण अणू–चैतन्य एकक

## द

42. देव पद चक्र : मानव चेतना स्वभाविक प्रवृत्तीमध्ये गुणात्मक विकास रूपात देव चेतनेकडे आणि देव चेतनेचा ऱ्हास होऊन मानव चेतनेमध्ये परिवर्तित होणे.

43. दिव्य पद : दिव्य चेतना उपकार प्रधान विधी नित्य वर्तमान, आचरणपूर्णता, उपकार प्रवृत्ती स्वभाविक प्रमाण.

44. दर्शन : स्थिती गती (रूप, गुण, स्वभाव, धर्म (यांच्या) समवेत स्वीकृती) मूल्यांकन वर्तमान प्रमाण.

45. दृश्य : व्यापक वस्तूमध्ये, वस्तूपासून, व्यापक वस्तूसाठी अविभाज्य रूपामध्ये असणे.

46. द्रष्टा : दृश्य स्थिती, वस्तू स्थिती, वस्तुगत सत्याला समजणे समजावणे.

47. दर्शन : ज्ञान स्थिती सत्य, वस्तू स्थिती सत्य, वस्तुगत सत्य स्वभाविक समज स्वीकृती प्रमाण.

48. दीक्षा : समजण्यासाठी आणि जगण्यासाठी निश्चित विधी स्वीकृती आणि निष्ठा

## ध

49. धरती : पदार्थावस्थेच्या रेणूंची रचित बृहद रचना जिच्यावर प्राण, जीव व ज्ञानावस्था प्रकट झाली आहे.

50. नश्वरत्व : परिणाम परिवर्तनशीलता स्वाभाविक न परंपरा.

51. नित्य वैभव : प्रत्येक अवस्था आणि पद (यांचे) आपल्या यथास्थिती मध्ये स्वाभाविक परंपरेमध्ये वैभव आणि वर्तमान (असणे).

52. नियति क्रम : पदार्थवस्थेतून प्राणावस्था, जीवावस्थेतून ज्ञानावस्थेचे स्वाभाविक प्रकटन परंपरा विधीने त्व सहित व्यवस्था आहे.

53. नियति विधी : पदार्थावस्था, प्राणावस्था, जीवावस्था, ज्ञानावस्थेचे निश्चित आचरण.

54. नित्य : निरंतर, सदा – सदा.

55. नियंत्रण : त्व सहित व्यवस्था – समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी.

56. नियम : आचरण स्वाभाविक निश्चियन.

57. न्याय : संबंध – मूल्य – मूल्यांकन – उभयतृप्ती व निरंतरता .

प

58. परिणाम : (अणूमध्ये अणूमध्ये) परिणाम, (अणूमध्ये परमाणूमध्ये) अंशाची संख्या कमी होणे – वाढणे.

59. प्रमाण : परंपरेच्या रूपात प्रकट होत राहणे. प्रकटनाची निरंतरता.

60. प्रकृति : पहिल्यापासूनच असल्याचे प्रमाण आणि असण्याच सूत्र व्याख्या संपन्नता.

61. प्राणकोशिका : प्राणसूत्र – रचना तत्त्व – पुष्टीतत्त्वाच्या संयुक्त रूपामध्ये रचित रचना आणि श्वसन – प्रश्वसनासहित रचना विधी स्वाभाविक रचना प्रवृत्ती संपन्न एकक.

62. पदार्थावस्था : पदाभेदाने अर्थभेद प्रकट करणारी.

63. प्राण पद चक्र : पदार्थावस्थेतून प्राणावस्था, प्राणावस्थेतून पदार्थावस्थेमध्ये परिणती.

64. प्रलोभन : शब्द – स्पर्श – रूप – रस – गंध इंद्रियांच्या अनुलूलतेविषयी विवश असणे. फ.

65. फळ : योजनेला कार्यान्वित केल्याने ज्या निरंतर प्राप्ती स्पष्ट झाल्या.

66. प्रणेता : प्रेरता प्रेरणा मिळवण्याचा स्त्रोत. परिपूर्ण रूपामध्य स्थिती सत्य , वस्तू स्थिती सत्य, वस्तुगत सत्याच्या रूपात स्पष्ट करणे.

ब

67 ब्रह्म : व्यापक वस्तूचे नाव.

68. बंधन : भ्रम, अतिव्याप्ती, अनाव्याप्ती, अव्याप्ती दोष.

भ

69. भागीदारी : फळ परिणामाला स्वीकारण्यासाठी केलेल्या क्रिया.

70. भय : जीव चेतनावश्य संबंधांमध्ये विश्वास होऊ न शकणे आणि प्रमाणित होऊ न शकणे. (परंत सतत) अपेक्षा असणे.

71. भागोन्माद : शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध इंद्रियांशी अनुकूलता करण्यामध्ये प्रवृत्ती आणि विवशता.

72. भ्रांतिपद : जीवसदृश जगत असताना मानवाचे मानव पदामध्ये असणे आणि भ्रमित मानव पदातून पुन्हा जीव चेतना पदामध्ये येण्याचे चक्र. जीवावस्थेतून भ्रांत मानव रूपामध्ये असणे आणि भ्रांत मानव, जीव रूपामध्ये असण्याची आवर्तन क्रिया.

73. भौतिक वस्तू : (परमाणू अणू) (रेणू अणू) रचित स्वरूपामध्ये वर्तमान.

म

74. मानव : मनाकाराला साकार करणारा, मनःवस्थतेला प्रमाणित करणारा.

75. मानवीयतापूर्ण आचरण : मूल्य, चारि़त्र्य (चरित्र), नैतिकता स्वाभाविक प्रमाण परंपरा.

| | | |
|---|---|---|
| 76. मध्यस्थ दर्शन | : | असण्यामध्ये, असण्यापासून, असण्यासाठी निरंतरता स्वभाविक सूत्र व्याख्या. |
| 77. मोक्ष | : | भ्रम मुक्ती, जागृती. |
| 78. मानव मूल्य | : | धीरता    दया<br>वीरता    कृपा<br>उदारता    करूणा |
| 79. मूल्य शिक्षा | : | जीवन मूल्य – मानव मूल्य – स्थापित मूल्य – शिष्ट मूल्य – उपयोगिता मूल्य – कला मूल्यांचा कर्माभ्यास, व्यवहाराभ्यास करवणारा शिक्षा कार्यक्रम. य, र, |
| 80 योजना | : | योग संयोगाने (वांछित) निरंतर प्राप्तीसाठी निर्णय करणे. |
| 81. रहस्य | : | असण्याची जाणीव असताना समज न होऊ शकण स्पष्ट न होऊ शकणे. |
| 82. रासायनिक वस्तू | : | संयुग क्रियेने (यौनिक क्रियापूर्वक) भौतिक आचारणापेक्षा भिन्न आचारणामध्ये वर्तमान असणे. (उदा : पाणी – एक जाळणारा, एक जळणारा यांचा योग (मीलन) झाल्यानंतर तहान भागवणारी वस्तू) |
| 83. राष्ट्र | : | पृथ्वीचा स्वाभाविक अखंड सूत्र व्याख्या. |
| 84. राष्ट्रीयता | : | अखंड समाज सूत्र व्याख्या. |
| 85. राष्ट्रीय चारित्र्य | : | (चरित्र) धरतीवर अखंड समाज रूपात समाधान, समृध्दी, अभय, सहअस्तित्व प्रमाण परंपरेच्या रूपात वैभावित असणे. |
| 86. रचना | : | धरतीसारख्या मोठया रचनेमध्येच संपूर्ण प्रकारांनी हिरवळ, जंगल, झाडे, रोपे, वनस्पती, औषधे, बी–वृक्ष विधीने परंपरा रूपात संपन्न क्रिया आणि जीव व मानव रचना. |

87. रसायन तंत्र : पृथ्वीवर पाण्याचा संयोग होण्यामुळे, पाण्यामध्ये आम्ल आणि अल्कली संयोगाने पुष्टी तत्त्व प्रकट (झाले), यातूनच उत्पन्न झालेल्या अनेक रसायन तत्त्वांच्या संयुक्त क्रिया.

88. राक्षस मानव : जीव चेतना क्रमामध्ये क्रूरतेने जगणारा.

89. रेणू (अणू) : जड अणूंचे (परमाणु) संघटित रूप, एकापेक्षा अधिक अणूंच्या (परमाणु) संयुक्त क्रिया.

ल

90. लाभोन्माद : कमी देऊन जास्त दृष्ट प्रवृत्ती आणि कार्य.

व

91. विचार : कार्यान्वित तर्क संगत निश्चयांची स्वीकृती.

92. वाद : विश्लेषण, गुणानुसार, युक्त गणिती विधीने प्रमाण आणि वर्तमान.

93. वर्ण : जो ज्या अवस्थेच्या चेतना विधीने संपन्न आहे, तोच त्याचा वर्ण (जीव चेतना – मानव चेतना – देव चेतना – दिव्य चेतना)

94. विकल्प : परंपरा स्वाभाविक गतीमध्ये समस्यांचे समाधान.

95.व्यापक : सर्वत्र विद्यमान – जड चैतन्य प्रकृतिमध्ये, प्रकृतिपासून, प्रकृतिसाठी प्राप्त साम्य ऊर्जा.

96. वर्तमान : वर्तत राहणे. स्थिती गती रूपात होत राहणे.

97. व्यवहाराभ्यास : संबंधांबरोबर समाधान, समृध्दीने मूल्य, चारित्र्य (चरित्र), नैतिकतेसहित जगण्याचा अभ्यास.

98. विव्दता : स्थिती सत्य, वस्तू स्थिती सत्य, वस्तुगत सत्य स्वभाविक अनुभव प्रमाण. ज्ञान विवेक, विज्ञान संपन्नता वर्तमान ,प्रमाण.

99. वस्तू : वास्तविकता प्रकट राहणे (असणे – राहणे, असण्या–राहण्याचा महिमा स्वाभाविक प्रमाण)

100. व्यवहारवाद : संबंध, मूल्य, मूल्यांकन, उभयतृप्ती, स्वधन, स्वनारी स्वपुरूष – दयापूर्ण कार्य व्यवहार, तन – मन – धन रूपी अर्थाचा सदुपयोग, सुरक्षेसंबंधी तर्कप्रयोजनासहित कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक अध्ययन आणि वार्तालाप.

101. वस्तू स्थिती सत्य : देश, काल, दिशा स्पष्ट वस्तुगत सत्य रूप, गुण स्वभाव, धर्म स्वाभाविक वर्तमान.

## स

102. संबंध : 1. शरीर संबंध 2. मानव संबंध
3. शिक्षा संबंध 4. व्यवस्था संबंध
5. उत्पादन संबंध 6. विनिमय संबंध
7. नैसर्गिक संबंध

103. स्थिती सत्य : सत्तेमध्ये संपृक्त प्रकृति

104. समजदारी : ज्ञान, विवेक, विज्ञान.

105. समर्पण : घेण्याचा इच्छेपासून मुक्त प्रदान क्रिया.

106. सभ्यता : विधी व्यवस्थेमध्ये भागीदारी, व्यवस्थेच्या अर्थाने सूत्र वयाख्या, समज रूपामध्ये सूत्र आणि जगण्याच्या रूपामध्ये व्याख्या.

107. संस्कृती : 5 पूर्णतेच्या अर्थाने केलेल्या क्रिया, कार्य व्यवहार, अभिव्यक्ती, संप्रेषणा, प्रकाशन.

108. समृध्दी : परिवाराच्या स्वाभाविक आवश्यकतेपेक्षा अधिक उत्पादन.

109. समाधान : समजदारी – इमानदारी – (जबाबदारी) (जिम्मेदारी) – भागीदारी, समजदारीनुरूप फल परिणाम असणे.

110. स्थापित मूल्य : 1. विश्वास 2. सन्मान 3. स्नेह
4. कृतज्ञता 5. गौरव 6. श्रध्दा
7. ममता 8. वात्सल्य 9.प्रेम

111. संपृक्त : व्यापक, पारगामी, पारदर्शी सत्तेमध्ये जड चैतन्य प्रकृति बुडालेली – भिजलेली – घेरली गेलेली. पूर्णतेच्या अर्थाने असण. पूर्णता – घडणपूर्णता, क्रियापूर्णता, आचरणपूर्णता, संपूर्णता = एकक + वातावरण.

112. सार्वभौम व्याख्या : दहा स्तरीय परिवारमूलक स्वराज्य व्यवस्था ज्यामध्ये धन खर्च न करता जनप्रतिनिधी सुलभ हाणे. सगळे प्रतिनिधी समजदारी , समृध्दीने संनन्न होणे. समजदारीने संपन्न समृध्दी सहित परिवाराचा प्रतिनिधी होणे आणि मानवीय शिक्षा संस्कार, न्याय सुरक्षा संस्कार, उत्पादन कार्य संस्कार, विनिमय कार्य संस्कार, स्वास्थ संयम संस्कार कार्यामध्ये भागीदारी करणारा परिवार प्रतिनिधी निवडण असणे खर्च न करता जनप्रतिनिधी सुलभ हाणे. सगळे प्रतिनिधी समजदारी, समृध्दीने संनन्न होणे. समजदारीने संपन्न समृध्दी सहित परिवाराचा प्रतिनिधी होणे आणि मानवीय शिक्षा संस्कार, न्याय सुरक्षा संस्कार, उत्पादन कार्य संस्कार, विनिमय कार्य संस्कार, स्वास्थ संयम संस्कार कार्यामध्य भागीदारी करणारा परिवार प्रतिनिधी निवडणे असणे.

113. सहअस्तित्ववाद : सत्तेमध्ये संपृक्त जड चैतन्य प्रकृति स्वाभाविक नित्य प्रभाव क्रिया (गतिविधि) वर्तमान.

114. सत्यापन : स्वतःमध्ये, स्वतःपासून, स्वतःसाठी यथास्थिती स्वाभाविक वर्णन.

115. संयम : समजदारी, इमानदारी, (जिम्मेदारी), भागीदारीची प्रमाण परंपरा.

116. समाधी : द्रव च्या असण्याची स्वीकृती आणि आशा, विचार, इच्छा शांत (मूक) होण्याचा द्रष्टा होण्याचा रूपात स्वीकृती.

117. साधना : साध्यसाठी प्रयास स्वभाविक क्रिया.

118. सत्य : सत्तेमध्ये संपृक्त प्रकृति – व्यापक स्वतू रूपी सत्तेमध्ये संपृक्त जड चैतन्य प्रकृति, स्थिती सत्य – वस्तूस्थिती सत्य – वस्तुगत सत्य बोध संपन्नता.

119. संतुलन : पदार्थावस्था, प्राणावस्था, जीवावस्था, ज्ञानावस्तूमध्य परस्पर पूरकता – उपयोगिता.

120. सहअस्तित्व : सत्तेमध्ये संपृक्त जड चैतन्य प्रकृति.

121. सहअस्तित्वाध्ये
विकास क्रम : अणूमध्ये (परमाणूमध्ये) अनेक अंशांच प्रस्थापन विस्थापन होणे.

122. सहअस्तित्वामध्ये
विकास : अणूमध्ये (परमाणूमध्ये) घडणपूर्णता (गठनपूर्णता).

123. सहअस्तित्वामध्ये
जागृतिक्रम : शरीर व जीवन सहित शरीराला मानत जगत असलेल्या मानव आचरणपूर्णता स्वाभाविक प्रमाण परंपरा आहे.

125. सहअस्तित्वामध्ये जागृती स्वाभाविक निरंतरता

- जागृत मानव परंपरा क्रियापूर्णता – आचारणपूर्णता स्वाभाविक निरंतरता.
- समाधान, समृध्दी, अभय, सहअस्तित्वमध्ये अनुभव प्रमाण, त्यांची निरंतरता.
- अखंड समाज, सार्वभौम व्यवस्था सूत्र व्याख्या, त्यांची निरंतरता.

126. शास्त्र : कायिक – मानसिक – वाचिक , कृत – कारित – अनुमोदित भेदांनी एकसूत्रात्मकता (एकापेक्षा अधिक साखळीचे दुवे)

127. शिक्षा : संस्कार ज्ञान, विवेक, विज्ञान संपन्नता.

128. शिक्षण : तंत्र , उत्पादन कार्यासाठी आवश्यक कारागीरीचा कर्माभ्यास.

129. श्रम : शरीर आणि जीवनाच्या संयुक्त रूपात जगत असताना मानवाने कुशलता, निपुणता, पांडित्याने उपयोगिता मूल्य, कला मूल्याला प्राकृतिक ऐश्वर्यावर स्थापित करणे.

ज्ञ

130. ज्ञान : सहअस्तित्व, जीवन व मानवीयतापूर्ण आचरण ज्ञान.

131. ज्ञाता : समजणे प्रमाणित होणे.

132. ज्ञानावस्था : जीव चेतनेपेक्षा श्रेष्ठ मानव चेतना
मानव चेतनेपेक्षा श्रेष्ठतर देव चेतना
देव चेतनेपेक्षा श्रेष्ठ दिव्य चेतना
स्वाभाविक मानव परंपरा आहे.

प्रकाशित व प्रकाशनाधीन प्रबंध अस्तित्व मूलक मानव केंद्रित चिंतन म्हणजेच मध्यस्थ दर्शन सहअस्तित्ववाद च्या ग्रंथांची सूची.

दर्शन

1. मानव व्यवहार दर्शन (प्रकाशित)
2. मानव कर्म दर्शन (प्रकाशित)
3. मानव अभ्यास दर्शन (प्रकाशित)
4. मानव अनुभव दर्शन (प्रकाशित)

वाद

1. समाधानात्मक भौतिकवाद (प्रकाशित)
2. व्यवहारवादी समाजशास्त्र (प्रकाशित)
3. अनुभवात्मक अध्यात्मवाद (प्रकाशित)

शास्त्रा

1. व्यवहारावदी समाजशास्त्र (प्रकाशित)
2. आवर्तनशील अर्थशास्त्र (प्रकाशित)
3. मानव संचेतनावादी मनोविज्ञान (प्रकाशित)

योजना

1. जीवन विदया योजना (प्रकाशनाधीन)
2. मानव संचेतनावादी शिक्षा, संस्कार योजना (प्रकाशनाधीन)
3. परिवार मुलक स्वराज्य व्यवस्था योजना (प्रकाशित)

अन्य

1. परिभाषा संहिता (प्रकशित)
2. जीवन विदया एक परिचय (प्रकाशित)
3. अस्तित्व अस्तित्व में परमाणु का विकास (प्रकाशित)
4. मानवीय संविधान सुत्र व्याखा (प्रकाशित)

- मी स्वतः काय आहे? कसा आहे? व काय इच्छितो?
- मी मानव आहे.
- मी मनाकाराला साकार करणारा व मनःस्वस्थतेचा आशावादी आहे.
- मी ज्ञानावस्थेचे एकक आहे.
- मी शरीर व जीवनाचे संयुक्त साकार रूप आहे – मानव परंपरेपासून प्रदत्त माझे शरीर तसेच अस्तित्वामध्ये परमाणूमध्ये विकासामुळळे जीवन हे स्वाभाविक स्वरूप आहे.
- मी जीवन स्वाभाविक रूपामध्ये जाणणे, मानणे, ओळखणे व निर्वाह करण्याच्या क्रिया आहे. शरीर रूपामध्ये 5 (पाच) ज्ञानेंद्रिये, 5 (पाच) कर्मेंद्रिये व त्यांच्या क्रियांचा द्रष्टा आहे.
- मी मानवत्वासहित व्यवस्था आहे.
- मी बौदिधक समाधान व भौतिक समृध्दी संपन्न होऊ इच्छितो.
- मी जीवन जागृती पूर्ण आणि त्यांची निरंतरता इच्छितो, त्याचबरोबर भ्रम, भय व समस्यांपासून मुक्त होऊ इच्छितो.
- मी सार्वभौम व्यवस्था व अखंड समाजामध्ये भागीदारी होण्याचा अधिकारी होऊ इच्छितो आणि स्वानुशासित होऊ इच्छितो व प्रत्येक मनुष्याला असे होताना पाहू इच्छितो .